महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२,दिनांक - ११ ऑक्टोबर, २०११

<u>अधिसुचना</u>

भारताचे संविधान.

क्रमांकः सीडीआर-२०११/प्र.क्र.१०९/११ - भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३०९ च्या परंतुकाप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत:-

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, २०११ असे म्हणण्यात यावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ मधील पोट-नियम ५ मध्ये खंड (क) नंतर पुढीलप्रमाणे परंतुक समाविष्ट करण्यात येईल:-

" परंतु, जेथे शासकीय कर्मचाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असेल तेथे,या नियमान्वये देण्यात आलेल्या किंवा देण्यात आला असल्याचे मानलेल्या निलंबनाच्या आदेशात फेरबदल करण्यापुर्वी वा तो रद्द करण्यापुर्वी,असा आदेश ज्या प्राधिकरणाने दिला असेल किंवा ज्या प्राधिकरणाकडून देण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल ते प्राधिकरण किंवा असे प्राधिकरण ज्याच्या नियंत्रणाखाली असेल असे प्राधिकरण, शासनाने या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या निलंबन आढावा समितीची शिफारस प्राप्त करुन घेईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

१५.१०.११

(पां.जो.जाधव)

शासनाचे उप सचिव